

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली



## शैक्षणिक वर्ष २०२१-२२

## मराठी विभाग आयोजित

**पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित व्याख्यान**

## 'शरद पवार : राजकीय, शैक्षणिक व कृषी क्षेत्रातील वाटचाल'

"महाराष्ट्रासह देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये मा. शरद पवार यांनी मोलाचे योगदान दिले आहे. एकिकडे शेतकरी, कष्टकरी, कामगार यांचा हिताचा विचार करत असताना समांतरपणे उद्योग-धंद्यांचे विकेंद्रीकरण करण्याचे महत्त्वाचे काम मा. पवार यांनी केले. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासदर वाढीचे बहुतेक सारे श्रेय मा. शरद पवारांना द्यावे लागेल. असे मत मा. अनील घाटगे यांनी व्यक्त केले. रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयांमध्ये पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'शरद पवार : राजकीय, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील वाटचाल' या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले होते. "सत्यशोधक विचारांनुसार बहुजन समाजाच्या सर्वांगीण हिताचा विचार करणारे दूरदृष्टी असणारे लोकनेते मा. शरद पवार यांच्या रूपाने महाराष्ट्राला मिळाला हे महाराष्ट्राचे भाग्य होय." असे मत डॉ. भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले.

यावेळी उपप्राचार्य (विज्ञान) डॉ. तानाजी भोसले, मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, डॉ. तेजस चव्हाण, शिक्षक वृंद उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले; तर आभार डॉ. शीतल पाटील मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र आणि मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले.

| |
|---|
| निष्पत्ती : मा. शरद पवार यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कृषीविषयक कार्याचा परिचय झाला. |

| |
|---|
| लाभार्थी संख्या : 150 |







मराठी विभाग प्रमुख,
विभागप्रमुख
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली) प्राचार्य पलूस, जि. सांगली